Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# महाराष्ट्रामध्ये वैधानिक विकास मंडळाचे महत्त्व

**शरदचंद्र आनंद आजबे**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
मो. 8806566546
sharadajabe6213@gmail.com

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले, यामध्ये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र मिळून यांचा एकत्रित महाराष्ट्र निर्माण झाला. यासाठी आपल्याला लढा द्यावा लागला. मराठवाडा हा मुलत: मराठी भाषिकांचा प्रदेश असूनही तो १७२४ सालापासून उर्दू भाषिक निजामी राज्यात समाविष्ट होता. १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र होवून सुध्दा मराठवाडा हा निजामाच्या ताब्यात होता. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्याच्या स्वातंत्र्याचा लढा लढविण्यात आला. भारत सरकारने ऑपरेशन पोलो राबवून १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा हा स्वतंत्र झाला. पुढे १९५६ साली देशभरामध्ये भाषावार प्रांतरचना झाली. त्यामध्ये मराठी भाषिक असणारे मराठवाडा आणि विदर्भ हे प्रदेश हैद्रबाद व मध्यप्रदेश या राज्यापासून अलग करून तत्कालीन द्विभाषिक मुंबई राज्यास जोडली गेली. विदर्भ हा २८ सप्टेंबर १९५३ रोजी काही करार करून महाराष्ट्रामध्ये समाविष्ट झाला. त्याला नागपूर करार असे म्हणतात.

१९५६ साली मराठवाड्याचे प्रश्न समोर मांडण्यासाठी गोविंदभाई श्रॉफ यांनी 'मराठवाडा विकास मंडळ' स्थापन केले. त्याचेच रूपांतर पुढे 'मराठवाडा जनता विकास परिषद' या संघटनेमध्ये झाले. संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यानंतर विदर्भ आणि मराठवाड्यामधील जनता यांना आरोग्य, शिक्षण, व्यवसाय, पर्यटन, लोकांच्या दरडोई उत्पन्नामध्ये वाढ होईल असे अपेक्षा होती परंतु नागपूर करारामध्ये करण्यात आलेल्या अटी पाळण्यात महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी महत्वाचे वाटले नाही. त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भ हे मागासच राहिले त्यामुळे गोविंदभाई श्रॉफ यांनी विदर्भ आणि मराठवाड्याच्या विकासासाठी १९७४ साली घटनेच्या कलम ३७१(२) या नुसार वैधानिक विकास मंडळाची स्थापना व्हावी अशी मागणी केली. १९८४ साली महाराष्ट्र सरकारने या विभागाचा अनुषेश किती प्रमाणात आहे. हे निर्धारित करण्यासाठी ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. वि.म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली यांच्या अहवालानुसार १९८२ च्या किंमतीवर आधारित एकत्रित अनुशेष ३,१८६.७८ कोटी होता त्यामध्ये मराठवाड्याच्या २३.५६%, विदर्भ ३९.१२% तर उर्वरित महाराष्ट्राच्या ३७.३२% आहे. हा अनुशेष ५ वर्षामध्ये दूर केला जावा आणि नंतर प्रत्येक पाच वर्षानी याचा आढावा घेण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली. त्यानंतर ३० एप्रिल १९९४ साली घटनेच्या कलन ३७१ (२) नुसार मराठवाडा, विदर्भ, उर्वरित महाराष्ट्र यासाठी वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली.

१९९५ साली भुजंगराव कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली विभागांच्या अनुशेष पुनर्निधारण करण्यासाठी समिती नेमण्यात आली. याचा अहवाल २००० साली शासनाला प्राप्त झाला त्यानुसार एकत्रित अनुशेष हा ३१८६.७८ कोटी वरून १४ हजार ७ कोटी रू. एवढा झाला. यामध्ये मराठवाडा २८.७७%, विदर्भ ४७.६०% उर्वरित महाराष्ट्र २३.६३% असे होते. याचा अर्थ असा होतो की, मराठवाडा व विदर्भ यांच्या अनुशेषामध्ये वाढ झाली तर उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष घटला. विदर्भ,

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

मराठवाडा विभाग औद्योगिकदृष्ट्या अप्रगत आहे. विदर्भ, मराठवाड्यामध्ये उद्योग, दरडोई उत्पन्न, शिक्षण, सहकार इ. बाबीमध्ये उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत हे विभाग मागास आहेत.

**तक्ता क्र. १**

**महाराष्ट्रातील दरडोई सांकेतिक स्थूल विभागानुसार मूल्यवृध्दि चालू किंमतीनुसार (२०१९-२०२०)**

| विभाग | २०१८-२०१९ | २०१९-२०२० |
|---|---|---|
| मराठवाडा | १,१७,२६५ | १,३१,३२८ |
| विदर्भ | २,७६,६६५ | २,९५,२१६ |
| उर्वरित महाराष्ट्र | ६,२६,८११ | ६,८०,९५८ |

या आकडेवारीवरून आपल्याला समजते की, विदर्भ आणि मराठवाडा यांचे एकत्रित दरडोई उत्पन्न सुध्दा हे उर्वरित महाराष्ट्रापेक्षा कमी आहे. म्हणजेच या भागाचा विकास हा झालेला नाही. म्हणून महाराष्ट्रामध्ये आर्थिक केंद्रिकरण झालेले आपल्याला दिसते हे समांतर उत्पन्न निर्माण करण्यासाठी वैधानिक विकास मंडळाची आवश्यकता आपल्याला जानवते जेणे करून आर्थिक अहवाल मांडत असतांना समान न्याय व्हावा.

**तक्ता क्र. २**

**महाराष्ट्रातील सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांची विभागावार प्रगती (सप्टेंबर २०१५ पर्यंत)**

| विभाग | सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग (संख्या) | रोजगार (संख्या लक्षमध्ये) |
|---|---|---|
| मराठवाडा | १८,७५१ | १,९३ |
| विदर्भ | ४१,२२४ | ३,६९ |
| उर्वरित महाराष्ट्र | १,८३,७४६ | २३,५७ |

वरील तक्त्यावरून सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग औद्योगिक संख्यापैकी केवळ ७.६९% उद्योग मराठवाड्यात आहेत तर विदर्भात १६.९१% आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये ७५.३९% आहे. यानुसार विभागानुसार निर्माण झालेला असमतोल पाहवयास मिळतो. मराठवाड्यामध्ये रोजगारामध्ये निर्माण झालेली टक्केवारी ६.६३%, विदर्भ १२.६४% उर्वरित महाराष्ट्र ८०.७५% आहे. औरंगाबाद सोडता मराठवाड्यामध्ये औद्योगिकीकरण झालेले दिसत नाही. जो पर्यंत औद्योगिक असमतोल कमी होणार नाही तो पर्यंत प्रादेशिक असमतोल कमी होणे शक्य नाही म्हणून महाराष्ट्र शासनाला या मागास विभागाकडे विशेष लक्ष देवून यांचा अधिकाधिक विकास कशाप्रकारे घडवून आणता येईल. याकडे लक्ष देवून महाराष्ट्राचा सर्वांगिण विकास करण्यात यावा.

**तक्ता क्र. ३**

**विशेष आर्थिक क्षेत्र व विभाग**

| विभाग | संख्या | क्षेत्र (हेक्टर) | रोजगार (लाख) | गुंतवणूक (रू. कोटी) |
|---|---|---|---|---|
| मराठवाडा | ३ | ३७५ | ०.१६ | ४,४८७ |
| विदर्भ | २ | १६९९ | ०.०१ | ७,७०० |
| उर्वरित महाराष्ट्र | ३२ | २४७९ | ७.६४ | ४६,३४४ |

मराठवाड्यामध्ये उर्वरित महाराष्ट्रापेक्षा विशेष आर्थिक क्षेत्र (हेक्टर),विदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात कमी झालेली दिसते. हे आर्थिक दारिद्रय दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळाकडे शासनाने लक्ष केंद्रित करावे. मराठवाडा आणि विदर्भ या मागास विभागांच्या अनुशेष निवारणाला आणि विकासाला महत्व न देता उलट या विभागाच्या निधीवर डोळा ठेवून हितसंबंधी राजकारण्यांनी राजकारण करण्याचे प्रयत्न गेल्या काही दशकात काही सत्ताधाऱ्यांनी केले हे आपल्याला वरिल आकडेवारीवरून समजते.

२००४-०५ साली विभागावार न्याय वाटपासाठी स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना करण्याची शिफारस करण्यात आली जेणेकरून मराठवाडा आणि विदर्भाला पाणी मिळावे. मराठवाडा हा अवर्षणग्रस्त प्रदेश असल्याकारणामुळे याठिकाणी पाऊस हा कमी प्रमाणात पडतो त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्राला गोदावरीचे पाणी हे जायकवाडी धरण ५०% भरल्याशिवाय त्याच्या पाणलोट क्षेत्रातील भागात पाणी अडवण्यास मनाई करणे, तापी खोऱ्यातील पाण्यासाठी निधी आरेखित करणे, उर्ध्व वैतरणा धरणातील पाणी ते धरण पुर्ण भरल्यानंतर वाहणारे अतिरिक्त पाणी कमी खर्चात मराठवाड्यात आणणे शक्य आहे. अशा विविध योजनामधून वैधानिक मंडळ कार्य करू शकतात.

मराठवाडा आणि विदर्भामध्ये उद्योग स्थापन करण्यास अनुकूल वातावरण आहे.परंतु मागील काही वर्षापासून या विभागाचे उद्योगाचे प्रमाण पाहता या विभागाच्या तुलनेत उर्वरित महाराष्ट्र हे अधिक सरस आहे. यामुळे आर्थिक दरी निर्माण झाली आहे.

३० एप्रिल २०२० रोजी या तीन वैधानिक विकास मंडळाचे मुदत पुन्हा पाचव्यांदा संपुष्टात आली. त्यानंतर मात्र महाराष्ट्र राज्य शासनाचे या वैधानिक विकास मंडळांना आणाखी मुदत वाढ देण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवलाच नाही. त्यामुळे ३० एप्रिल २०२० नंतर मराठवाडा, विदर्भ, आणि उर्वरित महाराष्ट्र या तीनही प्रदेशातल्या वैधानिक विकास मंडळाचे नेहमीप्रमाणे पुनर्गठन होऊ शकले नाही. अनुशेष निर्मूलनासाठी सूत्रांनुसार निधी मिळवून संबंधित खात्यामार्फत त्यांचा विनियोग करवणे आणि विभागात विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये आवश्यक ते सर्वेक्षण करून त्यांचे अहवाल राज्यपालांकडे पाठवणे या गोष्टी वैधानिक विकास मंडळ करत असत. आता जर हे बंद केले तर त्याला पुरक अशी व्यवस्था आपल्याकडे उपलब्ध हवी नाहीतर ही विषमतेची दरी आणखी वाढत जाईल. विभागातील लोकांच्या गरजा आणि त्यासाठी करावयाची कामे यासाठी लागणारी तांत्रिक, व्यवहारिक आणि लोकोपयोगी माहिती या मंडळामार्फत सहज मिळू शकते. त्यामुळे ही वैधानिक विकास मंडळे पूर्ववत सुरू ठेवणे हे विभागासाठी आणि राज्य शासनासाठी अत्यंत महत्वाचे आहे.

**संदर्भ :**

१. मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, वार्षिक अहवाल २०१५-१६, पृष्ठ क्र. १, १५, १६, १७, २१
२. महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल (२०२०-२१)
३. एस. एस. गाठाळ, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन (औरंगाबाद), पृष्ठ क्र. (४७१-५२५)
४. ए. बी. सवदी, महाराष्ट्राचा भुगोल, निराली प्रकाशन (पुणे) नववी आवृत्ती, २०२०-२१